# सर्वांसाठी घरे, रेरामधील असंख्य फायद्यातून एक खिशाला पडवणारे आणि वेगवान घरे

पुणे : भारताच्या वाढत्या लोकसंख्येला निवाऱ्याची देखील आवश्यकता आहे हे काही रहस्य राहिलेले नाही. २०२२ पर्यंत १०० दशलक्ष परवडणाऱ्या घरांची आवश्यकता आहे असे एका पाहणी अहवालानुसार दिसून आले आहे. ह्या वाढत्या मागणीने घरांच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसत नाही. मोठ्या प्रमाणातील स्थावर मालमत्तेची किंमत, पारदर्शकतेची अभाव, अस्पष्ट आणि लागणारा विलंब आणि निकृष्ट सेवा यांनी खरेदीदार हे बाजारापेठेपासून दूर गेलेले आहेत. ह्याची जाणीव करून, परवडणाऱ्यांया घरांची गरज आणि घरांच्या मागणी आणि पुरवठा यामधील समस्यांना सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे, आणि परवडणारा वित्त पुरवठा करणे ही सरकारची महत्वाची प्राथमिकता आहे.

सरकारने दोन पावले उचलेली आहेत एक प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) (ज्यामध्ये एमआयजीना देखील सामील करण्यात आलेले आहे) आणि स्थावर संपदा नियामन कायदा (रेरा). या दोन्हीमुळे फक्त परवडणाऱ्या घरांना सर्वोच्च स्थानी ठेवले नाहीतर त्यामुळे घर विकत घेणाऱ्यांचे काम सोपे केले आहे. या धोरणामुळे आणि लोकांच्यासाठी सुधारणावादी दूरदृष्टिकोनामुळे - खिशाला परवडवणाऱ्या घरांना आणि भांडवलासाठी वाट निर्माण करून दिलेली आहे. ज्यामुळे ग्राहकांना घरे मिळण्याची जबाबदारी आपल्यावर आलेली आहे आणि घरे खरेदी करणाऱ्यांचा मालमत्ता बाजारपेठेमध्ये गुंतवणूक करण्याचा विश्वास टिकून राहिलेला आहे. आजचा १२-वर्षातील कमी तारण दर आणि सरकारी अनुदान यामुळे सर्वोत्तम परवडणारी स्थिती निर्माण झालेली आहे, ही एक वस्तुस्थिती आहे.